# कल्लाप्पाण्णा आवाडे जवाहर शेतकरी सहकारी साखर कारखाना लि.,

हुपरी - यळगूड, ४१६ २०३, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर (महाराष्ट्र)
फोन (०२३०) २४५०४०२ ते ६, ई-मेल : kprjsssk@gmail.com वेबसाईट:www.kallappannaawadejawaharsssk.com

## -- ऊस पिक परिसंवाद --

कारखान्याच्या ऊस विकास योजनेअंतर्गत

**"बदलत्या हवामानामध्ये ऊस उत्पादन वाढीसाठी उपाय"**

या विषयावर ऊस पिक परिसंवाद आयोजित केला आहे.

**- कार्यक्रमाचे अध्यक्ष –**

**आदरणीय श्री. कल्लाप्पाण्णा आवाडे (दादा),**

संस्थापक चेअरमन

**- प्रमुख मार्गदर्शक -**

**मा. श्री. सुरेश माने-पाटील**

(निवृत्त शास्त्रज्ञ, वसंतदादा शुगर इन्स्टिटय़ूट, पुणे)

**- प्रमुख उपस्थिती -**

**आदरणीय आमदार श्री. प्रकाशआण्णा आवाडे,**

माजी वस्त्रोद्योग मंत्री, महाराष्ट्र राज्य

**मा.श्री. बाबासो चौगुले**
व्हाईस चेअरमन

**मा. डॉ. श्री. राहूल आवाडे,**
केन कमिटी चेअरमन

**मा. श्री. दादासो सांगावे**
संचालक

**मा. श्री. संजयकुमार कोथळी**
संचालक

**मा. श्री. सुकुमार किणींगे**
संचालक

**मा. सौ. वंदना कुंभोजे**
संचालिका

तेंव्हा या कार्यक्रमास आपण अगत्यपूर्वक उपस्थित रहावे, ही नम्र विनंती.

**- स्वागतोत्सुक -**

**किरण कांबळे**
मुख्य शेती अधिकारी

**मनोहर जोशी**
कार्यकारी संचालक

**अजित चौगुले**
सि. ॲग्री ओव्हरसियर,
(कुरूंदवाड विभाग)

**भास्कर पट्टणकुडे**
उपमुख्य शेती अधिकारी

**कार्यक्रमाची वेळ** : बुधवार दि. २६/०४/२०२३ रोजी सायं. ०५.०० वाजता.
**स्थळ** : जैन सांस्कृतिक भवन, **कुरुंदवाड.**




विषय :- बदलत्या हवामानामध्ये ऊस उत्पादन वाढीसाठी उपाय
मार्गदर्शक :- मा.श्री.सुरेश माने-पाटील ( निवृत्त शास्त्रज्ञ,वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट,पुणे)


शेतकरी
पिक
मार्गदर्शक :- मा.श्री.सुरेश माने-पाटील


ऊस उत्पादन वाढीसाठी उपाय
( निवृत्त शास्त्रज्ञ,वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट,पुणे)





ऊस पिक परिसंवाद







# शेतकऱ्यांना शेती शिवाय पर्याय नाही : कल्लाप्पाण्णा आवाडे

**कुरुंदवाड/प्रतिनिधी–**

शेतकऱ्यांना शेतीशिवाय पर्याय नाही. बदलत्या हवामानाचा कानोसा घेऊन शेती करणे गरजेचे आहे. ऊस उत्पादन घटल्याने भविष्यात साखर कारखाने व पर्यायाने शेतकरीही आर्थिक अडचणीत येण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेती टिकवून शेतीतून कमी खर्चात चांगले उत्पादन घेण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करावा असे आवाहन जवाहर साखर कारखाण्याचे संस्थापक माजी खासदार कल्लाप्पाण्णा आवाडे यांनी केले.




कल्लाप्पाण्णा आवाडे जवाहर साखर कारखान्याच्या वतीने येथील जैन सांस्कृतिक भवनात आयोजित 'शेतीविषयक पीक परीसंवादात' ते बोलत होते. अध्यक्षस्थानी आमदार प्रकाश आवाडे होते.

परीसंवादात वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट पुणे येथील निवृत्त शास्त्रज्ञ सुरेश माने पाटील यांचे 'बदलत्या हवामानामुळे उत्पादन वाढीसाठी आवश्यक उपाय ' या विषयावर शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी आमदार प्रकाश आवडे म्हणाले, शेतीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. बदलत्या हवामानामुळे उत्पादन घटत आहे. शेणखत कमी झाले आहे. आधुनिक पध्दतीने शेती करणे गरजेचे आहे.

या कार्यक्रमास जि. प. माजी सदस्य राहुल आवाडे, कारखान्याचे व्हा. चेअरमन बाबासो चौगुले, कार्यकारी संचालक मनोहर जोशी, संचालक दादासो सांगावे, संचालक संजयकुमार कोथळी, शितल आमणणावर, सुमेरू पाटील, वंदना कुंभोजे, विजय कुंभोजे, याच्यासह बाळासाहेब दिवटे, धनपाल आलासे, दादासो पाटील, अभिजीत पाटील, जयपाल उगारे, किरण कांबळे, भास्कर पट्टणकुडे उपस्थित होते.

# ऊसाचे उत्पादन वाढविण्यासाठी बियाने महत्वाचे : सुरेश माने-पाटील

**कुरुंदवाड (प्रतिनिधी) :** उसाचे विक्रमी उत्पादन घेण्यासाठी शेतकऱ्यांनी स्वतः बियाणाचे मळे तयार केले पाहिजे. ऊस ९ ते १०महिन्यांचा असावा. बियाणांसाठी जाड ऊस, लांब कांड्या साखर कमी असलेला ऊस आपल्या शेतातून निवडला पाहिजे. सरीतील अंतर वाढवा आणि उसाचे उत्पादन वाढवा हे तंत्र शेतकऱ्यांनी आत्मसात केल्यास उसाचे भरघोस उत्पादन मिळेल असे प्रतिपादन वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटचे माजी शास्त्रज्ञ सुरेश माने-पाटील यांनी व्यक्त केले.

येथील जैन सांस्कृतिक भवन येथे जवाहर सहकारी साखर कारखाना हुपरीतर्फे ऊस पीक परिसंवादातबदलत्या हवामानामध्ये ऊस उत्पादन वाढीसाठीहे उपाय या विषयावर बुधवारी सायं ५ वाजता व्याख्यान देताना माजी शास्त्रज्ञ सुरेश माने-पाटील बोलत होते. कारखान्याचे चेअरमन माजी खास.कल्लाप्पाण्णा आवाडे, आम.प्रकाश आवाडे, माजी जि.प सदस्य राहुल आवाडे, कारखान्याचे व्हा.चेअरमन बाबासाहेब चौगुले, माजी नगराध्यक्ष दादासाहेब पाटील, धनपाल आलासे आदी प्रमुख उपस्थित होते. मार्गदर्शन करताना माजी शास्त्रज्ञ सुरेश माने-पाटील म्हणाले, उसाची शेती करण्यासाठी यांत्रिकीकरण अवश्य आहे. सेंद्रिय कर्ब वाढविण्यासाठी शेणखत, हिरवळीची खते, पाचट व्यवस्थापन करावे,एकरी १००टन उत्पादन घेण्यासाठी सरीतील अंतर वाढविणे गरजेचे आहे,पाट पाणी पद्धतीने ऊस शेती करताना शेतीचे सपाटीकरण करावे,उसाची संख्या वाढण्यासाठी बाळ भरणी करावी,खोडव्यात पाचट व्यवस्थापन, बुडके तासणे, तुटाळी सांधणे आणि खत व्यवस्थापन ही पंचसूत्री कामे




आवश्यक आहेत. यावेळी स्वागत व प्रास्ताविक यांनी केले.

यावेळी माजी नगराध्यक्ष बाळासाहेब दिवटे, माजी जि.प सदस्य दादासो सांगावे, रावसाहेब रायनाडे, आण्णासाहेब चौगुले, रावसाहेब उगारे, दादासो पाटील, आप्पासो पोमाजी, बाबासो मालगावे, बाळासाहेब जोंग, महावीर चिंचवाडी, अजित आंबाडे, धोंडीराम चौगुले, राजू गुदले यांच्यासह शिरोळ तालुक्यातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते, आभार यांनी मानले.

# सरीतील अंतर वाढवल्यास भरघोस ऊस उत्पादन मिळेल : माने-पाटील

**कुरुंदवाड : प्रतिनिधी –**

उसाचे विक्रमी उत्पादन घेण्यासाठी शेतकऱ्यांनी स्वतः बियाणाचे रोपे तयार केले पाहिजे. ऊस ९ ते १० महिन्यांचा असावा. बियाणासाठी जाड ऊस, लांब कांड्या, साखर कमी असलेला ऊस आपल्या शेतातून निवडला पाहिजे. सरीतील अंतर वाढवा अन् उसाचे उत्पादन वाढवा. हे तंत्र शेतकऱ्यांनी आत्मसात केल्यास उसाचे भरघोस उत्पादन मिळेल. असे प्रतिपादन वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटचे माजी शास्त्रज्ञ सुरेश माने-पाटील यांनी केले. येथील जैन सांस्कृतिक भवन येथे कल्लाप्पाण्णा आवाडे जवाहर सहकारी साखर कारखान्यातर्फे ऊस पीक परिसंवादात बदलत्या हवामानामध्ये ऊस उत्पादन वाढीसाठीचे उपाय या विषयावर परिसंवाद झाला. माने-पाटील म्हणाले, उसाची शेती करण्यासाठी यांत्रिकीकरण अवश्य आहे, सेंद्रिय कर्ब वाढविण्यासाठी शेणखत, हिरवळीची खते, पाचट




व्यवस्थापन करावे,एकरी शंभर टन उत्पादन घेण्यासाठी सरीतील अंतर वाढविणे गरजेचे आहे,पाट पाणी पद्धतीने ऊस शेती करताना शेतीचे सपाटीकरण करावे,उसाची संख्या वाढण्यासाठी बाळ भरणी करावी, खोडव्यात पाचट व्यवस्थापन, बुडके तासणे, तुटाळी सांधणे आणि खत व्यवस्थापन ही पंचसूत्रीची कामे आवश्यक आहेत. स्वागत किरण कांबळे यानी तर प्रास्ताविक मनोहर जोशी यांनी केले.

आभार बाळासाहेब टोणे यांनी मानले. यावेळी कारखान्याचे चेअरमन माजी खा. कल्लाप्पाण्णा आवाडे,आ.प्रकाश आवाडे,माजी जि.प. सदस्य राहुलआवाडे, व्हा.चेअरमन बाबासाहेब चौगुले, धनपाल आलासे, माजी नगराध्यक्ष बाळासाहेब दिवटे ,दादासो सांगावे, रावसाहेब रायनाडे, आण्णासाहेब चौगुले, दादासो पाटील यांच्यासह शिरोळ तालुक्यातील शेतकरी उपस्थित होते.